आज़ादी का अमृत महोत्सव

# भारतीय स्वातंत्र्यसंग्राम आणि नेताजी




* संपादक *

डॉ. संतोष सु. कोटुरवार

# भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक युगनायक: नेताजी

**प्रा. डॉ. व्ही. व्ही. कदम**

हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालयातील, हिमायतनगर जि. नांदेड.

भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ज्या, ज्या थोर देशभक्तांचे योगदान लाभले त्या महान विभूती मध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या नावाचा अग्रक्रमाने उल्लेख केला जातो, या भारत मातेच्या बाणेदार देशभक्तांने कशाचीही पर्वा न करता संपूर्ण सुखाचा, संपत्तीचा त्याग करून भारतीय स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतली. प्रचंड व तीक्ष्ण बुद्धिमत्ता, विलक्षण स्मरणशक्ती, उत्कृष्ट नियोजकता, आकर्षक व्यक्तिमत्व, अभ्यासपूर्ण विवेचन शैली, भारदस्त आवाज, हिमालयासारखे उतुंग सहस, धबधब्याच्या प्रवाहासारखा उत्साह,कर्ण परंपरेतील अतुलनीय त्याग आणि उत्कट देशभक्ती यांनी ओत प्रोत भरलेल्या नेताजीं च्या भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील प्रवेशामुळे स्वातंत्र्यलढ्याची आणि राष्ट्रीय कॉंग्रेस ची चळवळ अधिक व्यापक, गतिमान आणि आक्रमक बनली. नेताजी सुभाषचंद्र बोस हे भारतीय इतिहासातील असे युगपुरुष आहेत ज्यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्याला नवे वळण व नवी दिशा दिली, लोकमान्य टिळकांच्या नंतर कॉंग्रेसच्या राजकारणातील एक जहाल विचारसरणीचे नेते म्हणून तसेच कॉंग्रेस मधील युवकांचे प्रेरणास्रोत, नेतृत्व म्हणून नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या नावाचा उल्लेख

करावा लागतो. प्रस्तुत शोधनिबंधात स्वातंत्र्य चळवळीतील अग्रगण्य नेतृत्व, एक युगनायक म्हणून नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा कार्यकर्तृत्वाचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

भारत देशातील महान स्वातंत्र्य सैनिक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सुभाषबाबूंचा जन्म ओरिसा प्रांतातील कटक शहरात एका संपन्न बंगाली कुटुंबात 23 जानेवारी 1897 रोजी वडील जानकिनाथ बोस व आई प्रभावती देवींच्या पोटी झाला. जानकीनाथ बोस हे कटक शहरातील नामवंत सरकारी वकील होते, तसेच ते एक प्रज्ञावान व स्वतंत्र विचारसरणीचे आणि प्रखड वृत्तीचे होते, तर आई अगदी संस्काराचे माहेरघर म्हणजेच शामची आई म्हणावी लागेल, वडीलांना इंग्रज सरकारने रावबहादूर पदवी दिली होती परंतु इंग्रजांची उर्मट भाषा आणि वाईट वर्तन पाहून त्यांनी इंग्रजांची नोकरी आणि पदवी दोन्हीचाही त्याग केला व स्वतःची वकिली सुरू केली, त्यांनी आपल्या सर्व अपत्यांना अत्यंत चांगल्या प्रकारचे संस्कार केलें.

सुभाषबाबूंचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण त्यांच्या जन्म गावी कटक येथील बॅप्टिस्ट मिशनच्या इंग्रजी शाळेत झाले. सुभाषबाबूंची लहानपणापासूनच बंडखोर वृत्ती आणि कुशाग्र बुद्धीमत्ता होती,त्यांना कुटुंबाबरोबरच शालेय जीवनात देखील राष्ट्र प्रेमाचे बाळकडू मिळालेले होते, त्यांनी वयाच्या पंधराव्या वर्षी गुरु च्या शोधत हिमालयाच्या दिशेने प्रस्थान केले होते परंतु त्यांना काही गुरुदर्शन झाले नाही,म्हणून त्यांनी स्वामी विवेकानंदाचे साहित्य वाचून त्यांनाच आपला गुरु मानले आणि परत अभ्यासाला

सुरुवात करून कलकत्ता येथीलमहाविद्यालयातून आपले पदवी चे शिक्षण पूर्ण केले. त्यांच्या वडिलांना मारखे वाटत होती की, सुभाषबाबूने आय.सी.एस.ची परीक्षा उत्तीर्ण करावी व ब्रिटिशांच्या प्रशासनात उच्चपदस्थ अधिकारी व्हावे आपल्या वडिलांच्या समाधानासाठी सुभाषबाबू आय. सी. एस. होण्यासाठी इंग्लंडला गेले व तेथील केंब्रिज विद्यापीठात प्रवेश घेऊन केवळ आठ महिने अभ्यास करून त्यांनी आय. सी. एस. ची परीक्षा गुणानुक्रमे चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण केली. इंग्रजांच्या प्रशासनात सनदी अधिकाऱ्याचे सर्वोच्च पद प्राप्त करून देणारी ही परीक्षा होती. ब्रिटिश शासनात सनदी अधिकारी पदाची सूत्रे हाती घेताना ब्रिटिश शासनाची एकनिष्ठ राहण्याची शपथ घेण्यास सुभाषचंद्र बोस यांनी नकार दिला व मी माझ्या मातृभूमीशी एकनिष्ठ राहील असे खडे बोल अधिकाऱ्यांना सुनावले आणि इंग्रज सरकारची चाकरी करण्यास नकार देऊन, नागरी सेवे ऐवजी त्यांनी मातृभूमीची सेवा करण्याचे वृत्त स्वीकारले, मातृभूमीला स्वातंत्र्य मिळवून द्यायचे तसेच जातीभेद, अज्ञान, अंधश्रद्धा, गरिबी, अनारोग्य या पाचशत्रू पासून भारतभूमीला मुक्त करण्याचे ध्येय त्यांनी उराशी बाळगले आणि आपल्या ध्येयाच्या पूर्ततेसाठी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभागी झाले, त्यांच्या स्वातंत्र्य चळवळीतील आगमनाने भारतीय स्वातंत्र्यलढ्याची चळवळ अधिकच आक्रमक आणि गतिमान झाली.

सनदी अधिकारी पदाचा त्याग करून नेताजी भारतात परत आल्यानंतर त्यांनी भारतीय परिस्थितीचे अवलोकन केले इंग्रज राजवटी कडून होत असलेला अन्याय,अत्याचार आणि त्यांच्या

हुकुमशाही वृत्तीमुळे आपल्या देशवासीयांची दैनिय अवस्था होत आहे हे पाहून त्यांना खूप दुःख झाले. त्यांनी सुरुवातीला गुरू रवींद्रनाथ टागोर यांचा विचार घेऊन नंतर मुंबई प्रांतात येऊन महात्मा गांधीजींची भेट घेतली व भारतीय परिस्थितीवर मोकळ्या मनाने त्यांच्याशी चर्चा केली. केवळ देश सेवेसाठी आय.सी.एस.चा त्याग करणाऱ्या ह्या तेजस्वी युवकांचे प्रभुत्व पाहून गांधीजी ही प्रभावित झाले आणि गांधीजींनी त्यांना बंगाल प्रांतात जाऊन चित्तरंजन दास बरोबर काम करण्याचा सल्ला दिला. गांधीजींनी सुरू केलेल्या असहकार चळवळीच्या माध्यमातून सुभाषचंद्र बोस यांचा राष्ट्रीय लढ्यात प्रवेश झाला. चित्तरंजन दास यांच्या नेतृत्वाखाली सुभाषबाबूंनी असहकार आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदवला,

याच कालावधी स्वदेशी शिक्षणाच्या प्रचारासाठी कोलकत्ता येथे चित्तरंजन दास यांनी नॅशनल कॉलेजची स्थापना केली व या कॉलेजमधील युवकांना राष्ट्रभक्तीचे धडे देण्यासाठी सुभाषबाबूच योग्य आहेत याची खात्री पटल्यानंतर त्यांनीं या कॉलेजचे प्राचार्य पद सुभाषबाबूंना दिले, प्राचार्य पदी विराजमान झाल्यानंतर त्यांनी शिक्षणाबरोबरच युवकांच्या मनात राष्ट्रभक्तीची ज्योत प्रज्वलीत करुन मातृभूमीच्या सेवेसाठी सर्वस्व अर्पण करण्याची शिकवण दिली, यामुळे हजारो युवक देश सेवेसाठी राष्ट्रीय आंदोलनात सक्रिय सहभागी झाले. त्याच कालावधीत गांधींच्या नेतृत्वाखाली संपूर्ण भारतभर असहकार आंदोलन सुरू होते त्यावेळी बंगाल आणि कलकत्त्याच्या प्रांतात असहकार आंदोलनाचे नेतृत्व नेताजींनी केले

या आंदोलनामुळे सरकार चांगलेच डबघायीस आले होते परंतु गोरखपुर येथील चौरी चौरा हत्याकांडामुळे असहकार आंदोलनास गांधीजींनी स्थगित केले, याच संधीचा फायदा घेऊन कॉंग्रेसच्या अनेक नेत्यांची धरपकड केली अनेकांना अटक केले त्यामध्ये सुभाषबाबूंना अटक करून सहा महिन्याच्या कारावासाची शिक्षा दिली. कारागृहातून बाहेर आले त्यावेळी बंगाल प्रांतावर अस्मानी संकट कोसळले, नद्यांच्या महापुरामुळे जनता हवाला दिल झाली होती, अशा परिस्थितीत नेताजींनी पूरग्रस्तांची सर्वतोपरी सेवा केली. याच कालावधीत चित्तरंजन दास यांनी 'स्वराज्य पक्षाची' स्थापना केली या पक्षाच्या मुखपत्राचे संपादक म्हणून सुभाषचंद्र बोस यांनी काम पाहिले त्याचबरोबर याच कालावधीत कोलकत्ता महानगरपालिकेत मुख्यअधिकाऱ्याचे पद नेताजीं कडे आले, त्यावेळी त्यांनी महानगरपालिकेत अनेक सुधारणा केल्या, नोकर भरती करीत असताना त्यांनी ज्या ज्या देश बांधवांनी स्वदेशासाठी काम केले, कष्ट,त्याग, यातना, कारावास सहन केला आहे किंवा बलिदान दिले आहे अशा लोकांनी व त्यांच्या वारसांनी नोकरीसाठी अर्ज करावेत असे जाहीर केले त्यामुळे सुभाषबाबूंना इंग्रज अधिकाऱ्यांनी कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला.

बंगालमधील क्रांतिकारक गोपीनाथ साहा यांने एका इंग्रज अधीकाऱ्यास ठार करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला त्यात तो पकडल्यागेला व त्यास फाशी झाली, त्यावेळी नेताजींनी गोपीनाथ चा पार्थिव देह मागून घेतला व त्याच्यावर अंत्यसंस्कार केले या कारणावरून सुभाषबाबू चा ज्वलंत क्रांतिकारकांशी संबंध आहे,

बंगालमधील क्रांतिकारकांचे तेच स्फूर्ती स्थान असल्याचा संशय व्यक्त करून इंग्रज सरकारने सुभाषबाबूंना दुसऱ्यांदा अटक केले व त्यांच्यावर कोणतेही कारण न देता अनिश्चित कालावधीसाठी म्यानमारमध्ये मंडालेच्या कारागृहात बंदिस्त केले. सततची धावपळ आणि तुरुंगवास आणि तुरुंगातील रोगट व क्लेशदायक वातावरणामुळे त्यांची तब्येत खालावली व त्यांना भयंकर अशा क्षयरोगांनी ग्रासले त्यावेळी सर्व बंगाली आणि भारतीय जनतेने त्यांच्या सुटकेची मागणी केली, त्यावेळी तुरुंगात असतानाच बाहेर बंगाल प्रांताच्या कायदे मंडळाच्या निवडणुकीत जनतेने नेताजींना बहुमताने निवडून दिले आणि त्यांची तुरुंगातून सुटका करण्यासाठी सरकारकडे आग्रह धरला जनतेतील आक्रमकता पाहून आणि सुभाषबाबू ची प्रकृती पाहून 1927 मध्ये त्यांची तुरुंगातून सुटका करण्यात आली, त्यावेळी नेताजींचे सर्वत्र स्वागत करण्यात आले भारतीय जनतेने आनंद उत्सव साजरा केला. बंगाली जनतेबरोबरच सर्व देश आणि राष्ट्रीय चळवळ त्यांच्याकडे उदयोन्मुख नेतृत्व या आशेने पाहत होती बंगालच्या जनतेने त्यांना बंगाल प्रांतिक परिषदेचे अध्यक्ष स्थान बहाल केले त्याच वेळी 1928 मध्ये भरलेल्या राष्ट्रीय काँग्रेसच्या मद्रास येथील अधिवेशनात नेताजींना काँग्रेसचे सरचिटणीस पद देण्यात आले त्याबरोबरच त्यांनी युवकांचे संघटन करण्यासाठी 'इंडिया इंडिपेंडन्स युथ लीग' ही युवकांची संघटना स्थापन केली, त्यामुळे काँग्रेस मधील तरुणांचे नेतृत्व सुभाषबाबूकडे आले, त्यांच्या कार्यपद्धती मुळे त्यांची लोकप्रियता सतत वाढत होती इस1929 च्या राष्ट्रीय अधिवेशनात सुभाषबाबूंनी

संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करणारा ठराव मांडला व तो ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला तसेच याच अधिवेशनात त्यांनी असंपूर्ण बहिष्कार याची कल्पना मांडली परंतु हा ठराव जहाल ठरवून नाकारण्यात आला. नेताजींनी प्रतिसरकारच्या स्थापनेची कल्पनाही मांडली होती,त्यांच्या जहाल विचारसरणीचा धसका सरकारने घेतला, याच कालावधीत कोलकत्ताच्या जनतेने महानगरपालिकेच्या महापौरपदी नेताजींची निवड केली. कॉंग्रेसच्या अधिवेशनात 26 जानेवारी 1930 हा दिवस स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा करण्याचे आव्हान नेताजींनी कले. 26 जानेवारी 1931 रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखाली कोलकत्ता शहरात भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले इंग्रज सरकारने या मिरवणुकीवर लाठी हल्ला केला त्यामध्ये नेताजी जखमी झाले उलट त्यांनाच दोषी ठरवून सहा महिन्याची सत्ता मजुरीची शिक्षा देण्यात आली

आपल्या सुटके नंतर नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी संपूर्ण भारतभर झंजावती दौरे केले, त्या काळात ते महाराष्ट्रातही आले होते 1932 च्या जानेवारी महिन्यात सुभाषबाबूना पुन्हा अटक करून तुंगत टाकले सततची धावपळ आणि तुंगवासामुळे ते गंभीर आजारी पडले त्यांची प्रकृती खालावत चालली होती राष्ट्रीय चळवळीतील नेत्यांनी त्यांच्या सुट्टीची मागणी केली होती परंतु इंग्रज सरकारने त्यांची तुरुंगातून सुटका करण्यासाठी नकार दिला, त्यांचे बरे वाईट होणे इंग्रज सरकारलाही परवडत नसल्याने त्यांची सुटका करण्यासाठी काही अटी घातल्या वैद्यकीय उपचारासाठी

त्यांना परदेशात पाठवण्यात येईल परंतु ते बरे झाल्यानंतर भारतात केव्हा परत येऊ शकतात हे सरकारने स्पष्ट केले नाही, त्यामुळे नेताजींनी विदेशात उपचारासाठी नकार दिला परंतु त्यांची तब्येत खूप खालावली त्यामुळे युरोपातील वैद्यकीय उपचारासाठी जाणे त्यांनी मान्य केले.इ.स 1933 मध्ये युरोपला गेले ते पुढील तीन वर्षे युरोपात उपचार घेत राहिले, आपल्या प्रकृतीचा उपचार करून ते थांबले नाहीत तर याच कालावधीत त्यांनी युरोपातील राजकीय परिस्थितीचा अभ्यास केला, तेथील अनेक देश भक्तांच्या व राष्ट्रीय नेत्यांच्या भेटी घेऊन युरोपातील देशांची भारतीय स्वातंत्र्यासाठी कशी मदत होऊ शकते याचा अभ्यास केला ऑस्ट्रियाची राजधानी व्हिएन्ना येथे असताना त्यांचे वडील जानकीनाथ बोस गंभीर आजारी असल्याचे पत्र त्यांना मिळाले ते पत्र हाती पडतात नेताजी भारतात परतले या परिस्थितीत ते हद्दपार असल्याकारणाने त्यांना भारताच्या भूमीवर पाऊल ठेवताच विमानतळावरच अटक करून कडक बंदोबस्तात घरी नेण्यात आले वेळ निघून गेली वडीलाच्या जिवंतपणे त्यांची भेट होऊ शकली नाही, हद्दपारमुळे 10 जानेवारी 1935 रोजी त्यांना पुन्हा युरोपात जावे लागले, जाताना भारत भूमीला जड अंतकरणाने त्यांनी निरोप दिला व स्वातंत्र्यलढा अधिक तीव्र करण्याचे त्यांनी जनतेला आव्हान केले राष्ट्रीय चळवळीत त्यांची प्रचंड उणीव भासत होती नेताजी देखील मातृभूमीत येण्यासाठी बेचैन होते, शेवटी इंग्रजांचे सर्व आदेश आणि हद्दपारी झुगारून देऊन इटालियन बोटीने ते भारताच्या दिशेने निघाले, मुंबईच्या बंदरावर त्यांच्या स्वागतासाठी प्रचंड जनसमुदाय जमला,

वंदे मातरम च्या घोषणा देण्यात येत होत्या परंतु बंदरातून उतरताच इंग्रज पोलिसांनी त्यांना अटक करून पुन्हा तुरुंगात टाकले त्यामुळे नेताजींच्या अटके विरुद्ध संपूर्ण देशात प्रचंड आंदोलन सुरू झाले. 10 मे 1936 हा दिवस 'सुभास दिन' म्हणून पाळण्यात आला राष्ट्रीय काँग्रेसने नेताजींच्या सुटकेसाठी आक्रमक भूमिका घेतली तसेच भारतीय जनतेतील प्रचंड असंतोष पाहून इंग्रजांनी 17 मार्च 1937 रोजी हद्दपारीच्या गुन्ह्यातून त्यांना मुक्त केले. सततचा तुरुंगवास अटक, छळ, हालअपेष्टा, वैयक्तिक सुखाचा संपूर्ण त्याग करून स्वतःच्या घरावर तुळशीपत्र ठेवणारे नेताजी सुभाषचंद्र बोस हे जनमानसांत प्रचंड लोकप्रिय बनले इस 1938 साली काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन हरिपूर या ठिकाणी भरले या अधिवेशनाचे अध्यक्ष पद नेताजींना मिळावे अशी सर्वांचे अपेक्षा होती या अधिवेशनासाठी गांधीजींनी काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून नेताजी सुभाषचंद्र बोस यांची निवड केली, राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षीय भाषणातून नेताजींच्या वैचारिक प्रगल्भतेचे दर्शन सर्व भारतीयांना झाले काँग्रेसच्या अध्यक्ष पदावरून कोणत्याही भारतीय राजकीय नेत्यांचे क्वचितच इतके प्रभावी भाषण कधी केले असावे. साम्राज्यवादाचा विरोध, समाजवादाचा पुरस्कार, स्वातंत्र्य, समता, बंधुता, सर्वधर्मसमभाव व भारतातील सर्वांना समान हक्क असे अनेक मुद्दे त्यांनी विस्तारित रूपाने मांडले. भारतीय स्वातंत्र्यलढा अधिक तीव्र केला जावा, काँग्रेसने आता जहाल भूमिका घेतल्याशिवाय पर्याय नाही. याच सुमारास युरोपात द्वितीय महायुद्धाची छाया पसरलेली होती, नेताजींचा असा उद्देश होता की इंग्लंडच्या कठीण

परिस्थितीचा फायदा घेऊन मातृभूमीला स्वातंत्र्य करावे त्यांनी आपल्या अध्यक्षपदाच्या कारकीर्दीत त्या दिशेने पावले टाकण्यास सुरुवात केली परंतु गांधीजींना नेताजींचा हा कार्यक्रम पसंत नव्हता. नेताजींच्या विचारास गांधीजींची सहमती नव्हती शत्रू संकटात असताना शत्रूला नामोहरण करणे हे गांधीजींच्या नैतिक अधिष्ठानात बसत नव्हते पुढे इ.स 1939 मध्ये राष्ट्रीय काँग्रेससाठी अध्यक्ष निवडीची वेळ आली तेव्हा नेताजींना अध्यक्षपदासाठी अशी व्यक्ती हवी होती की जे कोणत्याही दबावाला बळी पडणार नाही व कोणासमोर झुकणार नाही, गांधीजीने अध्यक्ष पदासाठी पट्टाभीसितारामय्या यांची निवड केली, त्यावेळी नेताजींनाच पुन्हा काँग्रेसचे अध्यक्षपद द्यावे अशी विनंती अनेक नेत्यांनी, वैज्ञानिकांनीही केली पण गांधीजी आपल्या विचारावर ठाम राहिले शेवटी तडजोड होऊ न शकल्यामुळे काँग्रेसच्या अध्यक्ष पदासाठी निवडणूक लागली या निवडणुकीत नेताजींचा विजय झाला अध्यक्षपदी त्यांची निवड झाली परंतु प्रश्न मिटला नाही. गांधीजींनी ही स्वतःची हार समजून नेताजींची कार्यपद्धती मान्य नसेल अशांनी काँग्रेस मधून बाहेर पडावे असे सांगितले इ.स 1939 चे वार्षिक अधिवेशन त्रिपुरा येथे भरले या अधिवेशनाच्या वेळी नेताजी तापाने इतके आजारी होते की, त्यांना स्ट्रेचर वर बसून अधिवेशनाला उपस्थित राहावे लागले गांधीजी या अधिवेशनाला उपस्थित राहिले नाहीत शेवटी राष्ट्रीय चळवळीत फूट पडू नये म्हणून एप्रिल 1939 रोजी नेताजींनी काँग्रेसच्या अध्यक्ष पदाचा राजीनामा दिला आणि 'फॉरवर्ड ब्लॉक' नावाचा एक स्वतंत्र पक्ष स्थापन केला आणि

सरकारविरुद्ध उघडपणे लढा देण्यास सुरुवात केली, त्यांनी सरकारशी लढा देण्याचे आव्हान भारतीय जनतेलाही केले 1940 मध्ये त्यांना भारत सुरक्षा कायदया खाली अटक करण्यात आली त्यांना या अटकेत अधिकाळ ठेवले तर भारतीय जनतेत असंतोषाची लाट पसरेल म्हणून 5 डिसेंबर 1940 रोजी सरकारने त्यांची सुटका करून त्यांना त्यांच्याच घरात नजर कैदेत ठेवले परंतु 17 जानेवारी 1941 रोजी ते नजर कैदेतून निसटले 26 जानेवारी 1941 पर्यंत नेताजी निसटल्याची बातमी सरकारला लागली नव्हती जर्मनीच्या आकाशवाणीवरून एके दिवशी नेताजी जर्मनीत असल्याची बातमी दिली तेव्हा नेताजी जर्मनीत असल्याचे समजले आपल्या देशाची सरहद्द पार करताना त्यांना अनेकदा वेशभूषा, केशभूषा अनेक नावे धारण करावी लागली, देशात पुढिल काळात नेताजींच्या विचारानुसार गांधीजींनी 1942 मध्ये चलेजावची चळवळ सुरू केली त्यावेळी काँग्रेसच्या सर्व प्रमुख नेत्यांना अटक केले तेव्हा नेताजी भारतात नव्हते अशा परिस्थितीत जर्मनीतील आकाशवाणीवरून चले जाव चळवळीला मार्गदर्शन करताना नेताजी म्हणाले, देशात एकाच वेळी सर्वत्र युद्ध सुरू करावे म्हणजे चोहिकडे कडे लक्ष देण्यास सरकारला कठीण होईल, युद्ध साहित्याचे कारखाने नष्ट करावेत, सरकारला कर मिळवून देणारी महसुलांची साधने बंद करावीत, कारागिरांनी संप करावेत, विद्यार्थ्यांनी घातपाती कृत्ये करावीत, भारतीय महिलांनी भूमिगत राहून स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या बांधवांना गुप्त संदेश मिळवून द्यावेत, सरकारी नोकरीतील भारतीयांनी सरकारी कचेरीतील गुप्त माहिती

आंदोलकांना द्यावी, ब्रिटिश अधिकाऱ्यांना घेराव घालावेत, प्रशासनात अडथळे निर्माण करावेत रेल्वे स्टेशनची नामधूस करावी व टेलिफोनच्या तारा तोडून टाका. माझ्या देश बांधवांनो धाडसी वज्रदेही बनुन इंग्रजांशी संघर्ष चालू ठेवा तरच आपल्याला स्वातंत्र्य मिळू शकते. इ.स.1942 मध्ये कॅप्टन मोहन सिंग आणि रासबिहारी बोस यांनी आझाद हिंद सेनेची स्थापना केली या आजाद हिंद सेनेचे सेनापतीपद नेताजी कडे दिले आझाद हिंद सेनेतील सैनिकांना उद्देशून बोलताना नेताजी म्हणाले, आपल्या ध्येयाच्या पूर्ततेसाठी मी बुडत्या अंधारात उगवत्या सूर्यात सुखात व दुःखात पराभवात व विजयात तुमच्याबरोबर राहील, भूक,तहान,मृत्यू या शिवाय मी तुम्हाला काही देऊ शकत नाही, परंतु तुम्ही जीवनाच्या खळग्यात मृत्यूच्या दाढेत पाठीशी राहाल याची मला खात्री आहे. 1 फेब्रुवारी 1944 रोजी आझाद हिंद सेनेने भारत भूमी कडे वाटचाल सुरू केली मार्च महिन्यात या फौजा इंफाळ व कोहिम भागात घुसल्या व या ठिकाणी भयंकर रनसंग्राम झाला. आपल्या सेनेला मनुष्यबळ व शस्त्राची आवश्यकता होती तेव्हा नेताजी सैनिकांना म्हणाले, 'सैनिकांनो तुम्ही मला रक्त द्या मी तुम्हाला स्वातंत्र्य देतो' कोहीम जिंकण्यात आझाद हिंद सेनेला यश आले परंतु डिसेंबर 1941 मध्ये नव्या दमाची अमेरिका मित्र राष्ट्राच्या बाजूने युद्धात उतरल्याने जर्मनी, इटलीचा पराभव झाला. ज्या मित्र संघावर नेताजींची भीस्त होती त्या जर्मनीच्या हिटलरने 30 एप्रिल 1945 रोजी आत्महत्या केली, त्यामुळे जर्मनीने शरणं गती पत्करली तरी पण नेताजींनी ब्रिटिश फौजेची संघर्ष चालू ठेवला जपानने शरणागती पत्करली

यावेळी नेताजी चौताळून म्हणाले मी शरणागती पत्करली नाही दिल्ली कडे जाणारी अनेक रस्ते आहेत त्यापैकी एक स्वातंत्र्याचा रस्ता आहे आपल्याला अपयश आले तरी खचू नका आपले बलिदान वाया जाणार नाही, भारत देश स्वतंत्र होईल आझाद हिंद सेनेचा पराभव होत होता मे 1945 मध्ये आझाद हिंद सेना कैद करण्यात आली यानंतर नेताजी नाट्यमय्यारी त्या गायब झाले.

**सारांश:-**

नेताजींचे संपूर्ण जीवन म्हणजे एक धगधगते यज्ञकुंड होते, भिक मागून कधीच कोणाला स्वातंत्र्य मिळवता येणार नाही ते शक्ती आणि युक्तीने मिळविले पाहिजे, मरावे कसे हे निश्चित करा म्हणजे जगावे कसे हे शिकाल, व्यक्तीच्या त्यागातून राष्ट्र उभे राहते, स्वातंत्र्य मिळत नाही मिळवावे लागते अशा त्यांच्या क्रांतिकारी विचारसरणीमुळे भारत मातेच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण करणाऱ्या हजारो क्रांतिकारकांचे ते प्रेरणास्थान बनले, नेताजींनी देशभक्तांची एक प्रचंड मोठी फळी उभारली होती, मातृभूमीला गुलामगिरीतून मुक्त करण्याचे जणू वेड लागलेले देशभक्त म्हणजे नेताजी,ते शेवटच्या श्वासापर्यंत भारत मातेला स्वातंत्र्य करण्यासाठी प्राणपणाने लढले. नेताजींनी केलेले कार्य आजही प्रत्येक तरुणाला प्रेरणा देणारे, अन्यायाविरुद्ध हातात शस्त्र घ्यावयास लावणारे आहे. मातृभूमीला पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी ज्यांनी आपले रक्त सांडवले, जे शहीद झाले, हुतात्मे झाले, जे हसतमुखाने फासावर गेले, त्यांचे कायम स्मरण होत राहते, देशवासीयांच्या मनात त्यांच्या विषयी असणारी भक्तीची, आदराची भावना आणि आदरयुक्त कृतज्ञता हीच



"तुम मुझे खून दो मै
तुम्हे आजादी दूंगा"

SIDDHI
PUBLISHING HOUSE
(National Publication)
Nanded, Maharashtra (India)
website : www.wiidrj.com

9 788196 052164